सहकारी साखर कारखान्यांच्या यंत्रसामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकामाच्या निविदा मंजूरीचा विचार करण्यासाठी राज्यस्तरीय समित्या.....

महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : ससाका-१०२०००/२९७३/प्र.क्र.१२८/३-स,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ मे, २०००.

वाचा:१) शासन आदेश क्रमांक सीएसके १०७४/७०४९/१३-स दि. १०.६.१९७६.
२) शासन निर्णय.कृषी व सहकार विभाग क्र. शाभाभा १०८६/सीआर १५९/ ३ सी, दि. १३.२.१९८७.
३) शासन निर्णय. कृषि व सहकार विभाग क्र. शाभाभा १०८६/सीआर १५९/ ३ सी, दि. १५ मार्च, १९८८.
४) शासन निर्णय. कृषि व सहकार विभाग क्र. शाभाभा १०८६/ सीआर१५९/ ३ सी, दि. २२ जून, १९८८.
५) शासन निर्णय. कृषि व सहकार विभाग क्र. शाभाभा १०८६/सीआर १५९/ ३ सी, दि. २१ जुलै, १९८८.
६) शासन निर्णय.सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका-३२९०/८३६२/ प्र.क्र. ५६/ ३ स, दि. १४ जानेवारी, १९९४.
७)शासन निर्णय.सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका-३९९५/ प्र.क्र.१९०/३ स, दि. ६ जानेवारी, १९९६.
८)शासन निर्णय.सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका-१०९४/४/९५८/ प्र.क्र. १३ / ३ स, दि.९ जानेवारी, १९९६ व २९ जानेवारी, १९९६.
९ )शासनआदेश क्र. ससाका-१०९५/१८४/प्र.क्र. १५१/ ३ स, दि. ३० जानेवारी, १९९६.
१०)शासनआदेश क्र. ससाका-१०९५/१८४७०/ प्र.क्र. १५१/ ३ स, दि. १९ जून, १९९७.

प्रस्तावना :

राज्यस्तरीय मशिनरी खरेदी समितीचे कामकाज शासन आदेश क्रमांक सीएसके १०७४/७०४९/१३ स दिनांक १०.६.१९७६ अन्वये साखर संघाकडे होते. शासन

निर्णय सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक ससाका ३२९०/ ८३६२/ प्रक्र. ५६/३ स दिनांक १८.१.१९९४ अन्वये साखर आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन सदर समितीचे कामकाज त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्याप्रमाणे शासन निर्णय दिनांक १.१.१९९६ अन्वये साखर आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली पुनरगठीत केलेल्या सिव्हील बांधकाम समिती कामकाज सोपविण्यात आले होते. परंतु हे कामकाज साखर संघाच्या अध्यक्षतेखाली साखर कारखान्याचे काही अध्यक्ष, साखर धंदयाशी संबधीत संस्थाचे प्रतिनिधी, शासनाचे प्रतिनिधी व साखर धंदा मशिनरीमधील तज्ञ यांची समिती असावी अशी साखर संघाची मागणी होती.

२. दिनांक ८ मार्च, २००० रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकित घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे विस्तारीकरण, जुन्या यंत्रसामुग्रीच्या जागी आधुनिक यंत्रसामुग्री बसविणे, उपपदार्थांचे प्रकल्पासाठी लागणारी यंत्रसामुग्री खरेदी करणे, बांधकामा संबंधीच्या निविदा मंजूर करणे इत्यादी बाबी साठी वेगवेगळ्या समित्या पुनर्गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

या शासन निर्णया व्दारे राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या यंत्रसामुग्री खरेदी प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी शासन पुढील प्रमाणे राज्यस्तरीय यंत्रसामुग्री खरेदी समिती पुनर्गठीत करीत आहे. या समितीचे सदस्य खालील प्रमाणे राहतील.

**राज्यस्तरीय यंत्रसामुग्री खरेदी समिती**

| | |
|---|---|
| १) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ. | अध्यक्ष |
| २) उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ | सदस्य |
| ३) उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ | सदस्य |
| ४) महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाने निर्दीष्ट केलेले ९ विभागवार सदस्य | सदस्य |
| ५) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ६) वसंतदादा साखर संशोधन संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ७) राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे तांत्रिक अधिकारी | सदस्य |
| ८) संबंधित कारखान्याचे अध्यक्ष | निमंत्रित |
| ९) संबधित कारखान्याचे कार्यकारी संचालक | नि ंत्रित |
| १०) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ | सदस्य सचिव |

यंत्रसामुग्रीच्या किंमतीमध्ये फार मोठया प्रमाणावर वाढ झाल्यामुळे वित्तीय मर्यादा,यापुढे यंत्रसामुग्री निविदा मंजूरी बाबतच्या मर्यादा खालीलप्रमाणे विहित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

**मंजूरीची वित्तीय मर्यादा**

| | |
|---|---|
| १) रु. ५०.०० लाखापर्यंत | कारखाना स्तरावर संचालक मंडळाच्या संमतीने. |

वरील वित्तीय मर्यादेच्या अधिन राहून सर्व कर व शुल्कांसह, परंतु अंदाजपत्रकीय दरापर्यंत जर कारखान्याला अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्विकारणे भाग पडल्यास कारखान्याने आवश्यक त्या तपशीलासह आणि कारण मिमांसे सहित अधिक्याचा प्रस्ताव साखर आयुक्तालयाकडे मंजुरीसाठी पाठवावा. साखर आयुक्तालयाच्या मंजूरीनंतर निविदा अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

वित्तीय मर्यादा :-

| | |
|---|---|
| २) रु. ५०.०० लाखाचे वर पण रु. १००.०० लाखापर्यन्त | साखर आयुक्त पुणे |
| ३) रु. १००.०० लाखाचे वर | शासन नियुक्त राज्य स्तरीय यंत्र सामुग्री खरदी समिती. |

रु. ५० .०० लाखापेक्षा जास्त किंमतीच्या यंत्रसामुग्री किंवा इतर वस्तु यांची खरेदी जाहीर खुल्या निविदा मागवून विषद केलेल्या कार्यपध्दतीने करावी.

कारखान्याने निविदा त्यांच्या कक्षेत आणण्यासाठी अंदाज पत्रकीय रकमेचे तुकडे पाडून निविदा मागवू नयेत. ज्या दराने अंदाजपत्रकी य मान्यता / तांत्रिक मान्यता मिळाली आहे त्याच रकमेच्या निविदा मागवाव्यात. जर काही बाबतीत तुकडे पाडणे अपरिहार्य असेलच तर त्याकरिता साखर आयुक्तालयाची पूर्व परवानगी घ्यावी.

**साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समिती**

२. तसेच रु. ५०.०० लाख ते रुपये १००.०० लाखातील रकमेच्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीची रचना खालीलप्रमाणे राहिल:-

| | |
|---|---|
| १) साखर आयुक्त | अध्यक्ष |

३) राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे तांत्रिकअधिकारी — सदस्य

४ ) कार्यकारी अभियंता (साखर) — सदस्य सचिव

५) संबंधित कारखान्याचे अध्यक्ष — निमंत्रित

६) संबंधित कारखान्याचे कार्यकारीसंचालक — निमंत्रित

तांत्रिक उपसमिती

रु. २५.०० लाख अंदाजपत्रकीय रकमेवरील मशिनरी खरेदीच्या निविदांसाठी निविदा पूर्व बैठक खालील तांत्रिक उपसमितीच्या सदस्यांच्या सोईने योग्य त्याठिकाणी ठेवाव्यात. तांत्रिक उपसमितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

१) वसंतदादा साखर संशोधन संस्थेचे तांत्रिक अधिकारी

२) राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे तांत्रिक अधिकारी.

३) कार्यकारी अभियंता (साखर),साखरआयुक्तालय.

४)संबंधित साखर कारखान्याचे मुख्य अभियंता (निमंत्रित)

५) संबंधित कारखान्याचे कार्यकारी संचालक (निमंत्रित)

रु. २५.०० लाख अंदाजपत्रकीय रकमेवरील सर्व निविदा अंतिम करण्यापूर्वी अशा कामांची एक निविदा पूर्व (प्री-बिड) सभा घेण्यात यावी, निविदा पूर्व बैठकीत झालेल्या निर्णयाचा सामाईक बदल संच(कॉमन सेट ऑफ डेव्हिएशन) तयार करुन सर्व निविदाकारांना द्यावा.

या तांत्रिक उपसमितीने मशिनरी पुरवठादारांशी निविदा प्रश्नांबाबत विचार विनिमय केल्यानंतर मानके (स्पेसिफिकेशन्स), निविदेच्या अटी व शर्ती, कामाची मुदत इ. मध्ये काही बदल करावयाचे असतील तर त्यांचा सामाईक बदल संच(कॉमन सेट ऑफ डेव्हीएशन) सर्व निविदाकारांना द्यावा. अशा प्रकारचा सामाईक बदल संच हा निविदेचा भाग समजला जाईल.

//सर्व समित्यांनी निविदा स्विकारताना प्रचलित पध्दतीनुसार निविदा उघडल्यानंतर सर्वात निम्नस्तर दाराच्या निविदाकारांनाच वाटाघाटीसाठी बोलवावे व निविदा अंतिम कराव्यात. निविदा उघडण्यापूर्वी कारखान्यास एखाद्या पुरवठादाराबाबत किंवा त्याच्या पात्रतेबद्दल किंवा कार्यक्षमतेबद्दल आक्षेप असतील तर निविदा उघडण्यापूर्वीच ते समितीच्या निदर्शनास आणावेत आणि या आक्षेपांचा विचार करुन समितीने निविदा उघडावी किंवा कसे याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. मात्र एकदा निविदा उघडल्यानंतर निम्नस्तर पुरवठादारांशीच चर्चा करावी.//

प्रचलित पध्दतीनुसार सर्व प्रकारच्या को-या निविदांची विक्री कारखाना स्तरावर तसेच साखर आयुक्तालयाच्या स्तरावर होईल. भरुन प्राप्त झालेल्या निविदा कारखाना स्तरावर आणि साखर आयुक्तालय स्तरावर स्विकारल्या जातील. साखर आयुक्तालयाने प्राप्त

झालेल्या निविदा राज्यस्तरीय यंत्रसामुग्री खरेदी समितीस पुढील कार्यवाहीसाठी सादर करावेत.

३. राज्यस्तरीय स्थापत्य बांधकाम समिती

राज्यातील सहकारी साखर कारखान्यान्यांच्या स्थापत्य बांधकाम निविदा बाबत विचार करण्यासाठी शासन पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय स्थापत्य बांधकाम समिती पुनर्गठीत करीत आहे. या समितीचे सदस्य खालीलप्रमाणे राहतील.

| | |
|---|---|
| १) अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ. | अध्यक्ष |
| २) साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ३) मुख्य अभियंता किंवा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई. | सदस्य |
| ४)सचिव,सहकार किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) सचिव, वित्त किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६) सचिव,उद्योग किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७) साखर आयुक्तालयातील कार्यकारी अभियंता | सदस्य सचिव |
| ८)संबंधित कारखान्याचे अध्यक्ष | निमंत्रित |
| ९) संबंधित कारखान्याचे कार्यकारी संचालक | निमंत्रित |

साखर आयुक्तालयातील कार्यकारी अभियंता (साखर) यांनी सदस्य सचिव या नात्याने बांधकामांच्या निविदांच्या संदर्भात आवश्यक ती माहिती तसेच आर्थिक व तांत्रिक मूल्यमापनाचे विवरणपत्र समितीच्या उपयोगासाठी सादर करावे आणि समितीच्या निर्णयानुसार संबंधित कारखान्यास परवानगी द्यावी .

नव्याने मंजूर झालेल्या / होणा-या विस्तारीकरणाखाली असलेल्या किंवा जोडधंदे सुरु करणा-या सहकारी साखर कारखान्यांकरिता तसेच जेथे रु. १००.०० लाख किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाचे बांधकामाचे काम करावयाचे आहे अशा कामाचे संदर्भात बांधकामाच्या निविदांना उपरोक्त समितीची मंजूरी आवश्यक राहील असे शासनाचे आदेश आहेत.

तथापि, बांधकामासाठी लागणा-या साहित्यांच्या दरामध्ये फार मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यामुळे यापुढे स्थापत्य बांधकामे निविदा मंजुरीबाबतच्या मर्यादा खालीप्रमाणे विहित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

<u>मंजूरीची वित्तीय मर्यादा</u>

१) रु. ५०.०० लाखा पर्यन्त — कारखाना स्तरावर संचालक मंडळाच्या संमतीने

वरील वित्तीय मर्यादेच्या अधिन राहून सर्व कर व शुल्कांसह, परंतु अंदाजपत्रकीय दरापर्यन्त, जर कारखान्याला अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्विकारणे भाग पडल्यास कारखान्याने आवश्यक त्या तपशीलासह आणि कारण मिमांसे सहीत अधिक्याचा प्रस्ताव साखर आयुक्तालयाकडे मंजूरीसाठी पाठवावा. साखर आयुक्तालयाच्या मंजूरी नंतर निविदा अंतिम करण्याची कार्यवाही करावी.

<u>वित्तीय मर्यादा</u>

२)रु. ५०.०० लाखाचे वर पण रु. १००.०० पर्यंत — साखर आयुक्त

३) रु. १००.०० लाखाचे वर — शासन नियुक्त राज्यस्तरीय यंत्र सामुग्री खरेदी समिती

रु. ५.०० लाखापेक्षा जास्त किंमतीच्या स्थापत्य बांधकाम किंवा बांधकाम साहित्याची खरेदी जाहीर खुल्या निविदा मागवून विहित केलेल्या कार्यपध्दतीने करावी.

कारखान्याने निविदा त्यांच्या कक्षेत आणण्यासाठी अंदाजपत्रकीय रकमेचे तुकडे पाडून निविदा मागवू नयेत. ज्यादराने अंदाजपत्रकीय मान्यता /तांत्रिक मान्यता मिळाली आहे त्याच रकमेच्या निविदा मागवाव्यात. जर काही बाबतीत तुकडे पाडणे अपरिहार्य असेल तर त्या करिता साखर आयुक्तालयाची पूर्व परवानगी घ्यावी.

४. <u>साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समिती</u>

तसेच रु.५०.०० लाख ते रु. १००.०० लाखातील रकमेच्या स्थापत्य बांधकामास मंजूरी देण्यासाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीची रचना खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १. साखर आयुक्त | अध्यक्ष |
| २. वसंतदादा साखर संशोधन संस्थेचे तांत्रिक अधिकारी | सदस्य |
| ३. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे तांत्रिक अधिकारी | सदस्य |
| ४. कार्यकारी अभियंता (साखर) | सदस्य सचिव |
| ५. संबंधित कारखान्याचे अध्यक्ष | निमंत्रित |
| ६. संबंधित कारखान्याचे कार्यकारी संचालक | निमंत्रित |

## तांत्रिक उपसमिती

रु.२५.०० लाख अंदाजपत्रकीय रकमेवरील मशिनरी खरेदीच्या निविदांसाठी निविदा पूर्व बैठक खालील तांत्रिक उप समितीच्या सदस्यांच्या सोयीने योग्य त्या ठिकाणी ठेवाव्यात. तांत्रिक उपसमितीची रचना खालील प्रमाणे राहील :-

१) वसंतदादा साखर संशोधन संस्थेचे तांत्रिक अधिकारी
२) राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे तांत्रिक अधिकारी.
३) कार्यकारी अभियंता (साखर),साखरआयुक्तालय.
४)संबंधित साखर कारखान्याचे मुख्य अभियंता (निमंत्रित)
५) संबंधित कारखान्याचे कार्यकारी संचालक (निमंत्रित)

रु.२५.०० लाख अंदाजपत्रकीय रकमेवरील सर्व निविदा अंतिम करण्यापूर्वी अशा कामांची एक पूर्व निविदा (प्री.बि ड ) सभा घेण्यात यावी. पूर्व अर्हता बैठकीत झालेल्या निर्णयाचा बदल संच (कॉमन सेट ऑफ डेव्हिएशन) तयार करुन सर्व निविदाकारांना द्यावा.

तांत्रिक कंत्राटदारांशी चर्चा केल्यानंतर मानके (स्पेसिफिकेशन) , निविदेच्या अटी व शर्ती , कामाची मुदत इ. कांही बदल करावयाचे असतील तर त्यांचा सामाईक बदल संच (कॉमन सेट डेव्हिएशन) सर्व निविदाकारांना द्यावा. अशाप्रकारचा सामाईल बदल संच हा निविदेचा भाग समजला जाईल.

सर्व समित्यांची निविदा स्विकारताना प्रचलित पध्दतीनुसार निविदा उघडल्यानंतर सर्वात निम्नस्तर दराच्या निविदाकारांनाच वाटाघाटीसाठी बोलवावे व निविदा अंतिम कराव्यात. निविदा उघडण्यापूर्वी कारखान्यास एखाद्या कंत्राटदाराच्या कार्यक्षमतेबाबत किंवा पात्रतेबाबत आक्षेप असतील तर निविदा उघडण्यापूर्वीच ते समितीच्या निदर्शनास आणावेत आणि या आक्षेपांचा विचार करुन समितीने निविदा उघडावी किंवा कसे या बाबत योग्य तो निर्णय घ्यावा. मात्र एकदा निविदा उघडल्यानंतर निम्नस्तर कंत्राटदारांशीच चर्चा करावी.

प्रचलित पध्दतीनुसार सर्व प्रकारच्या को-या निविदांची विक्री कारखाना स्तरावर तसेच साखर आयुक्तालयाच्या स्तरावर होईल. भरुन प्राप्त झालेल्या निविदा कारखाना स्तरावर आणि साखर आयुक्तालय स्तरावर स्विकारल्या जातील. साखर आयुक्तालयाने प्राप्त

ल्या निविदा राज्य स्तरीय बांधकाम समितीस पुढील कार्यवाहीसाठी सादर कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( ग. रा. साळवी )
उपसचिव महाराष्ट्र शासन

मा.मुख्यमंत्री
मा.राज्यमंत्री (सहकार)
प्रधान सचिव (वित्त)
प्रधान सचिव (नियोजन)
सचिव (सहकार)
सचिव (उद्योग)
सचिव (सार्वजनिक बांधकाम)
साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे.
साखर आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम.
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ,मुंबई.
राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ,दिल्ली.
सर्व प्रादेशिक सह संचालक (साखर)
सर्व जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था.
सर्व सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक
मुख्याधिकारी,कृषि औद्योगिक विकास,महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई
निवड नस्ती (३-सी)